# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 15th July 2025 ( No. of Pages 04 ) ( No : 12

# MINUTES

**of the General Body Meeting of**
**NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION**
**held at 12.00 noon on *SUNDAY, the 29th June, 2025 at***

## *SHRI SHIVAJI ARTS & COMMERCE COLLEGE, AMRAVATI*

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 29th June, 2025 at Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati.

Prof. P.B. Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0058, 0302, 1122, 1177, 1792, 1948, 1982, 2120, 2138, 2603, 2853, 2867, 3000, 3017, 3085, 3341, 3368, 3391, 3432, 3449, 3462, 3471, 3518, 3550, 3573, 3595, 3631, 3750, 3809, 3835, 3852, 3889, 4019, 4036, 4047, 4076, 4097, 4169, 4170, 4289, 4302, 4346, 4411, 4435, 4448, 4492, 4678, 4696, 4808, 4863, 4869, 4878, 4898, 4914, 4953, 4954, 5000, 5104, 5119, 5219, 5233, 5337, 5240, 5281, 5283, 5284, 5290, 5294, 5298, 5341, 5381, 5401, 5409, 5478, 5486, 5634, 5668, 5688, 5689, 5713, 5733, 5751, 5782, 5787, 5805, 5810, 5816, 5818, 5876, 5885, 5890, 5891, 5914, 5915, 5925, 5927, 5930, 5931, 5944, 5964, 5971, 5980, 5983, 6003, 6004, 6037, 6072, 6076, 6119, 6147, 6162, 6165, 6174, 6176, 6177, 6180, 6183, 6199, 6201, 6269, 6289, 6306, 6311, 6320, 6380, 6383, 9640, 9641.

Signed sheets of papers recording the attendance are included on pages 142 to 149 of and will form part of, the "BOOK OF ATTENDANCE" of General Body meetings.

Agenda of the General Body meeting was circulated on pages 117 to 118 of 2025 NUTA Bulletin.

### ITEM NO. 890 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on SUNDAY, the 2nd March, 2025 at Shri Bhayyaji Pandharipande National Institute of Social Work Hanuman Nagar, Nagpur.

***Notes :- (1)*** *Copy of the minutes was Circulated on pages 93 to 97 of 2025 NUTA Bulletin.*

***(2)*** *Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on SUNDAY, the 2nd March, 2025 at Shri Bhayyaji Pandharipande National Institute of Social Work Hanuman Nagar, Nagpur vide No.CIM/55 Dated 15th March, 2025 published on page 98 of 2025 NUTA Bulletin. No correction was received.*

***विषय क्रमांक ८९० (१) :***
***प्रा.भाष्कर सीताराम पाटील यांचे दुःखद निधन***

प्रा.भाष्कर सीताराम पाटील यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.विलास ठाकरे यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

नुटाचे आजीव सदस्य व मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथील सेवानिवृत्त प्रा. भाष्कर सीताराम पाटील यांचे २० ऑगस्ट २०२४ ला दुःखद निधन झाले. त्यांचा संघटनेचा आजीव सभासद क्र. २४४ हा आहे. रुरल इन्स्टिट्युट येथे १९४६ ला कम्युनिटी डेव्हलपमेंट या विषयाकरिता ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांची सेवा एकूण ३६ वर्षांची झाली होती व ते नुटा मध्ये सक्रीय होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८९० (२) :***
***प्राचार्य श्री.दलपतराव संपतराव कापसे यांचे दुःखद निधन***

प्राचार्य श्री.दलपतराव संपतराव कापसे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.डॉ.काशीनाथ बऱ्हाटे यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आदरणीय दलपतराव संपतराव कापसे यांचे दिनांक ४ जून २०२५ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. प्राचार्य डी.एस.कापसे सर नुटा संघटनेच्या पहिल्या पिढीतील आजीव सदस्य असून त्यांचा आजीव सदस्य क्रमांक ८७९ आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सावरगाव हे सरांचे जन्मगाव असून त्यांच्या अध्यापनाचा प्रदीर्घ कालखंड नेरपरसोपंत येथे व्यतीत झालेला आहे. इतिहास विषयाचे एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून सरांची ख्याती होती. प्रदीर्घ काळ इतिहास विषयाचे अध्यापन केल्यावर १९९३ ते १९९८ या काळात सरांनी नेहरू महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. आपल्या सेवेच्या कालखंडात सरांनी आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख आणि प्रा.डॉ.पी.एन.देशमुख यांच्यासोबत नुटा संघटनेत निष्ठेने कार्य केले आहे. सरांनी त्यांच्या सेवा कालावधीत नागपूर आणि अमरावती विद्यापीठाचा विविध प्राधिकारिणींवर कार्य केले आहे.

एक विद्यार्थीप्रिय, व्यासंगी प्राध्यापक, प्रशासनकुशल प्राचार्य, शिक्षक संघटनेतील क्रियाशील कार्यकर्ते, कुटुंबवत्सल व्यक्ती, एक मनमिळावू, निगर्वी व्यक्तिमत्त्व म्हणून सर सर्वपरिचित होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८९० (३) :***
***प्रा.अरुण के. टोपरे यांचे दुःखद निधन***

प्रा.अरुण के. टोपरे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.डॉ.अजय रेळे यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

श्री.बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ येथील सेवानिवृत्त शारीरिक शिक्षण संचालक व एन.सी.सी. अधिकारी मेजर अरुण के.टोपरे (आजीव सदस्य क्र.१६२९) यांचे दि. २७.०६.२०२५ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. मनमिळाऊ, विद्यार्थीप्रिय, सर्वांना सहकार्य करणारे शिस्तप्रिय शिक्षक होते. महाविद्यालयाच्या जडणघडणीमध्ये त्यांचा मोठा वाटा होता. एन.सी.सी. अधिकारी म्हणून मेजर रँक पर्यंत यांनी सेवा दिली. ४७ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. यवतमाळ चे

**No.CIM/ 56 : : Date 15.07.2025**

**CORRECTION**
**in the copy of the Minutes**
**of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 29th June, 2025 at Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati is circulated in this NUTA Bulletin. If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to **Dr.Nitin C. Kongre,** Secretary, NUTA, Plot No. 144, Gayatri Nagar, Behind IT Park, Nagpur-440022 by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration. Please send one copy of your letter to Prof. P. B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan Wadi, Rajapeth, Amravati. 444 601.

**- Dr.Nitin C. Kongre, *Secretary***

प्रभारी कमांडींग ऑफीसर म्हणून त्यांनी पदभार सांभाळला. महाविद्यालयाच्या नुटा युनिटचे अनेक वर्षे ते अध्यक्ष होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

**सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली.** संमत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवितील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

## ITEM NO. 891 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**CONSIDERED AND APPROVED** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2024.

***Notes :*** *(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.26 of 2025) and was placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report was circulated in this NUTA Bulletin on page 119 to 121.*

*(iii) Dr. Nitin C. Kongre, Secretary presented the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 892 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**APPROVED** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2025.

***Notes :*** ***(i)*** *Dr. Dilip V. Hande, Treasurer, NUTA, presented the Budget on behalf of the Executive Committee.*

***(ii)*** *The copy of the Budget was circulated on page No.118 of 2025 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 893 :
## *SUBMISSION OF STATEMENTS OF AUDITED ACCOUNTS*

**NOTED** the submission of statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2024 to The Deputy Charity Commissioner Nagpur region, Nagpur by The Secretary NUTA, DR.NITIN KONGRE vide Acknowledgement No. NGP/251017/TA/24 Date : 27.01.2025.

***Notes :*** *Copy of the Acknowledgement No. NGP/251017/TA/24 Date : 27.01.2025 regarding Submission of Audited Accounts for the year ending on 31st March, 2024 was circulated on page 122 of 2025 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 894 :
## *CHANGE REPORT*

**(A) NOTED** the Order of the Deputy Charity Commissioner, Nagpur Region, Nagpur, dated 28.01.2025, approving the change Report due to the Election of Executive Committee of NUTA held on 19.12.2021, at Shri Shivaji Science College, Amravati.

**(B) NOTED** the Order of the Deputy Charity Commissioner, Nagpur Region, Nagpur, dated 28.01.2025, approving the amended constitution in view of resolution of General Body dated 27.11.2022.

***Notes :-*** *(1) The copy of the Order of the Deputy Charity Commissioner, Nagpur Region, Nagpur, dated 28.01.2025, approving the change Report and the amended constitution was circulated on page 123 of 2025 NUTA Bulletin.*

## विषय क्रमांक ८९५ :
## *महागाई भत्त्याचा शासननिर्णय*

"राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून सुधारणा करण्याबाबत." या विषयावरील महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १० जुलै, २०२४ रोजीच्या शासननिर्णयाची (क्रमांक : मभवा-१३२४/प्र.क्र.०३/सेवा-९) **नोंद घेण्यात आली.**

***नोट्स*** *:- राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून सुधारणा करण्याबाबतचा महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक १० जुलै, २०२४ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय क्रमांक : मभवा-१३२४/प्र.क्र.०३/सेवा-९ पृष्ठ १२८ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.*

## ITEM NO. 896 :
## *G.R. REGARDING DEARNESS RELIEF ON PENSION/ FAMILY PENSION*

**NOTED** the Government Resolution No.: DRP-2024/ CR. 49 /SER-4 Dated 10th July 2024 issued by the Finance Department Government of Maharashtra regarding Dearness Relief Increase to 50% on Pension/Family Pension w.e.f. 1 st January, 2024.

***NOTE :-*** *The Government Resolution No.: DRP-2024/CR. 49 /SER-4 Dated 10th July 2024 issued by the Finance Department Government of Maharashtra regarding Dearness Relief Increase to 50% on Pension/ Family Pension w.e.f. 1 st January, 2024 was circulated on page 125 of 2025 NUTA Bulletin.*

## *विषय क्रमांक ८९७ :*
## *गणसंख्या :*

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

## विषय क्रमांक ८९८ :
## *आभार*

**सभा व्यवस्थेबद्दल आभार** : कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी**
*अध्यक्ष*

स्वा / **डॉ.नितीन कोंगरे**
*सचिव*

*****

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
(Ministry of Education, Govt. of India)
Bahadurshah Zafar Marg, New Delhi-110002
Phone : 011-23604328, 011-23604201
F.No. 10-18/2024(PS/Misc)
**2 July 2025**

The Principal Secretary,
Higher & Technical Education,
Government of Maharashtra,
409, Annex Building, Hutatma Rajguru Chowk,
Madam Kama Road, Mantralaya, Mumbai-400032

**Subject : Exempting Teachers from NET, who have completed M.Phil degrees before 11.07.2009 - Reg.**

Sir,

With reference to your letter No.M190C-2204/ CR9V/UNI-1 dated 15 July 2024 on the subject cited above, **I am directed to inform you that the proposals received from the Directorate of Higher Education were examined through an Expert Committee constituted by the Chairman, UGC.** Accordingly, as per the recommendations of the Committee, approved by the Commission in its 591st meeting held on 24.06.2025, exemption from National Eligibility Test (NET) is granted in respect of their **appointment to 1421 teachers (as per the list attached) who have completed M.Phil degrees before 11.07.2009 and are in regular/permanent service** after their appointment on or before 14th June 2005. Needless to mention, **the benefits under the Career Advancement Scheme for such candidates are to be governed as per the applicable Regulations at the time of their eligibility.**

You are, therefore, requested to take further necessary action on the matter.

Yours faithfully

**(Dr.Nikhil Kumar)**
Deputy Secretary

*राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात सन २०२५-२६ पासून टप्प्या-टप्प्याने करणेबाबत.*

# महाराष्ट्र शासन : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.९४/एस.डी.-४ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : १६ एप्रिल, २०२५**

**संदर्भ :** (१) राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० (२) शासन अ.शा.पत्र क्र.२०२२/प्र.क्र.४९/एसडी-६, दिनांक २२ मार्च, २०२२ (३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४९/एसडी-६, दिनांक २४ जून, २०२२ (४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - संकिर्ण-२०२२/प्र.क्र.८८/एसडी-६, दिनांक १६ जानेवारी, २०२३ (५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/एसडी-४, दिनांक २४ मे, २०२३ (६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/एसडी-४, दिनांक २ जानेवारी, २०२४ (७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/एसडी-४, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ (८) राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ (९) पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम-२०२४ (१०) राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ (११) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र.राशैसंप्रपम/अविवि/सुकाणू/२०२५/०१३६५, दिनांक १०.०३.२०२५

## *प्रस्तावना*

**राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० हे एकविसाव्या शतकातील पहिले शिक्षण धोरण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात १९६४-१९६६ मध्ये कोठारी आयोग व १९८६ मध्ये आलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण यामुळे राज्य व देशातील शिक्षणामध्ये अनेक सुधारणा घडवून आणलेल्या आहेत.** आता जवळपास ३४ वर्षानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक २९ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ला मंजुरी देण्यात आलेली आहे. या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये पूर्वीच्या या १०+२+३ या रचनेमध्ये बदल करून ५+३+३+४ याप्रमाणे रचनात्मक बदल करण्यात आलेला आहे. यामध्ये पायाभूत स्तरापासून - पदवी स्तरांपर्यंतच्या शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. सदर राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी सुरू आहे. **सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच मुलभूत स्तंभांवर उभारलेले हे धोरण संविधानिक मूल्यांवर आधारित आहे.** तसेच सन २०२३ पर्यंत साध्य करावयाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांशी हे धोरण जोडले गेलेले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अंमलबजावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या कार्यांच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २४ जून २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, **पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.** तसेच या शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भ क्र. ४ येथील दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई **यांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती स्थापन करण्यात आली आहे.**

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० अनुसार ५+३+३+४ आकृतीबंधातील शिक्षणाचे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण (ECCE) यावर आधारित पायाभूत स्तर तसेच शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण व प्रौढ शिक्षण या घटकांचे अवलोकन करून राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्व व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र. ५ येथील दिनांक २४ मे, २०२३ **रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.** सदर समितीमध्ये संदर्भ क्र. ६ व ७ येथील शासन निर्णयान्वये नवीन सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ आधारित तयार केलेल्या पुस्तकांचा देशातील २३ राज्यांकडून वापर करण्यात येत आहे. या पाठ्यपुस्तकांची निर्मिती देशभरातील विविध क्षेत्रातील नामवंत, अनुभवी तज्ज्ञ यांच्याकडून करण्यात आली आहे. या पाठ्यपुस्तकांवर आधारित राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांची तयारी केली जाते. देशभरात ही पाठ्यपुस्तके विविध मंडळांच्या शाळांमधून वापरण्यात येतात. **मा.मंत्री (शालेय शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सुकाणू समिती, शिक्षण क्षेत्रातील नामवंत व अनुभवी तज्ज्ञ यांनी साकल्याने विचार करून, महाराष्ट्र राज्यातही राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेली इयत्तानिहाय त्या त्या विषयाची पाठ्यपुस्तके टप्प्या-टप्प्याने आवश्यक त्या बदलासह व संदर्भीकरणासह वापरण्याचे निश्चित केले आहे.**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम - २०२४ हे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (State Council of Educational Research and Training, Maharashtra), **पुणे यांचेमार्फत तयार करण्यात आले आहेत.** तसेच, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ वर आधारित राज्य अभ्यासक्रम **आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ तयार करण्यात आला आहे. शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२५ ची निर्मिती सुरू आहे.**

मा.मंत्री, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षेतखाली गठित राज्यस्तरीय सुकाणू समितीने राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४, **पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम-२०२४ तसेच राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ यांना मान्यता प्रदान केलेली आहे.** या दृष्टीने पायाभूत स्तर व शालेय शिक्षण स्तराच्या सर्व उपस्तरांसाठी या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## *शासननिर्णय*

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (State Council of Educational Research and Training, Maharashtra), पुणे यांचेमार्फत तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४, तसेच राज्य **अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदी योग्य त्या बदलांसह टप्प्या-टप्प्याने लागू करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.**

**१. आकृतीबंध** :- राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० प्रमाणे नव्याने तयार झालेले स्तर (५+३+३+४) खालीलप्रमाणे आहेत. राज्यामध्ये या स्तरांची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | स्तर | वयोगट | इयत्ता |
|---|---|---|---|
| १. | पायाभूत स्तर | (वय वर्षे ३ ते ८) | बालवाटिका-१, २, ३ तसेच इयत्ता १ ली व २ री |
| २. | पूर्वतयारी स्तर | (वय वर्षे ८ ते ११) | इयत्ता ३ री, ४ थी व ५ वी |
| ३. | पूर्व माध्यमिक स्तर | (वय वर्षे ११ ते १४) | इयत्ता ६ वी, ७ वी व ८ वी |
| ४. | माध्यमिक स्तर | (वय वर्षे १४ ते १८) | इयत्ता ९ वी, १० वी, ११ वी व १२ वी |

यापुढे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या स्तराऐवजी वरीलप्रमाणे पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर, माध्यमिक स्तर हे शब्द वापरण्यात यावेत.

**२. नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणी** :- राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी राज्यातील शाळांमध्ये सर्व संबंधित विभागांमार्फत सन २०२५-२६ पासून टप्प्या-टप्प्याने पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अंमलबजावणी वर्ष | इयत्ता |
|---|---|
| सन २०२५-२६ | इयत्ता १ ली |
| सन २०२६-२७ | इयत्ता २ री, ३ री, ४ थी व ६ वी |
| सन २०२७-२८ | इयत्ता ५ वी, ७ वी, ९ वी व ११ वी |
| सन २०२८-२९ | इयत्ता ८ वी, १० वी व १२ वी |

बालवाटिका - १, २, ३ राबविण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या सहमतीने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

**३. भाषाविषयक धोरण** :- सद्यस्थितीत मराठी व इंग्रजी माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत केवळ दोन भाषा अभ्यासल्या जात आहेत. उर्वरित माध्यमांच्या शाळांमध्ये त्रिभाषा सुत्रानुसार मराठी व इंग्रजी भाषा बंधनकारक असल्यामुळे माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जात आहेत.

**राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता १ ली ते ५ वी साठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल.** अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता ६ वी ते १० वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण प्रमाणे असेल.

**४. अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्मिती व सेतू अभ्यास** :- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांच्या आधारे राज्याच्या गरजा लक्षात घेऊन राज्यासाठीचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करण्यात येत आहे. संबंधित स्तराचे अंतिम पाठ्यसाहित्य निर्मितीसाठी बालभारतीस विहित वेळेत उपलब्ध करून देण्यात यावे.

नवीन अभ्यासक्रम पहिल्यांदाच लागू होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सेतू अभ्यासक्रम संबंधित सर्व इयत्तांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार करावा व तो आवश्यक त्या सर्व वर्षांमध्ये वापरण्यात यावा.

५. **पाठ्यपुस्तके व पाठ्यसाहित्य :-**

• राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांच्यामार्फत **राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र राज्यासाठी आवश्यक असे सर्व बदल करून स्वीकारण्यात यावीत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत नमूद पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायक आणि रंजक असणे, आवश्यक शिक्षण आणि तार्किक विचारसरणी वाढविण्यासाठी अभ्यासक्रमाचा मजकूर कमी करणे, अनुभवात्मक शिक्षण, इत्यादी बाबींचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये असणे आवश्यक आहे.**

तसेच मूल्यमापन, अध्यापन पद्धती, वेळापत्रक, निरीक्षण व सनियंत्रण, शिक्षकांचे प्रशिक्षण, इ. सर्वांगीण बाबींमध्ये आवश्यक त्या सुधारणा राज्य **शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत निर्गमित करण्यात याव्यात.**

• बालभारतीची पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये वेळोवेळी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संबंधित विभाग प्रमुख व विषय तज्ज्ञ यांचा सहभाग असावा. सदर पाठ्यपुस्तके ही निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तींची पूर्तता करणारी व अंमलबजावणीसाठी योग्य आहेत किंवा कसे याची पडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी करावी. **त्यानंतर सदर अंतिम पाठ्यपुस्तकांना आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समन्वय समितीची मान्यता घ्यावी. राज्यस्तरीय समन्वय समितीचे मान्यतेनंतरच पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी करता येईल.**

• अंमलबजावणी वेळापत्रकानुसार, इयत्तानिहाय पाठ्यपुस्तके आवश्यक सर्व माध्यमांत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांची राहील.

• पाठ्यपुस्तकांना पूरक साहित्य, हस्तपुस्तिका इ. निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत करण्यात यावी.

• बालवाटिका १, २, ३ चा पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य, आशय इ. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे कार्यालयाने तयार करून महिला व बाल विकास विभागाकडे छपाई व वितरणासाठी सुपूर्द करावा.

६. **विषय योजना :-** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ यामध्ये सुचविलेली विषययोजना अंमलबजावणी टप्प्यांनुसार राबविण्यात यावी. **याबाबत अधिक स्पष्टतेसाठी आवश्यकतेनुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.**

७. **मूल्यमापन :-** राष्ट्रीय शिक्षण धोरण व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांमधील तरतुदींनुसार शालेय विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापनविषयक मार्गदर्शक सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे **यांनी स्वतंत्ररित्या निर्गमित कराव्यात. त्यासाठी समग्र प्रगती पत्रकाचा (Holistic Progress Card - HPC) आधार घ्यावा.**

८. **शालेय वेळापत्रक व तासिकांचे नियोजन :-** राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ यामध्ये सुचविलेल्या दैनिक, साप्ताहिक, वार्षिक वेळापत्रकानुसार, इयत्तानिहाय, विषयनिहाय निश्चित केलेल्या तासिकांची संख्या व कालावधीनुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यात यावी. सत्र निश्चितीचा कालावधी हा संचालक प्राथमिक/माध्यमिक यांनी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या सल्ल्याने निश्चित करावा. द्वितीय सत्र अखेरचे संकलित मूल्यमापन/वार्षिक परीक्षा या सत्रअखेरच घेण्यात याव्यात व **त्यांचे वेळापत्रक आवश्यकतेनुसार संचालक प्राथमिक/माध्यमिक यांनी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या सल्ल्याने निर्गमित करावे.**

९. या शासन निर्णयामध्ये नमूद नसलेल्या इतर सर्व बाबी प्रचलित पद्धतीप्रमाणे चालू राहतील.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२५०४१६१५५३५८०७२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(तुषार महाजन)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

*इयत्ता १ ली ते ५ वी साठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या राज्य मंडळाच्या शाळांमध्ये हिंदी भाषेच्या अनिवार्यतेबाबत*

## *महाराष्ट्र शासन : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग*

शासन शुद्धिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.९४/एस.डी.-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : १७ जून, २०२५**

**संदर्भ :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक - संकीर्ण-२०२५/प्र.क्र.९४/एस.डी.-४ दिनांक १६ एप्रिल, २०२५

### *शासन शुद्धिपत्रक*

संदर्भाधीन शासन निर्णयातील अनु. क्र. ३ येथील 'भाषाविषयक धोरण' या शीर्षकाखालील उपपरिच्छेदामध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे:-

"राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता १ ली ते ५ वी साठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या **शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल.** अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता ६ वी ते १० वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण प्रमाणे असेल."

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे :-**

**राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता १ ली ते ५ वी साठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल;** परंतु या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास, त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल. तथापि, हिंदी ऐवजी इतर भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्यास इच्छुकता दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांच्या शाळेतील इयत्तानिहाय संख्या ही किमान २० इतकी असणे आवश्यक राहील. **हिंदी ऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता उपरोक्तप्रमाणे विहित किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छुकता दर्शविल्यास, त्या भाषेच्या अध्यापनाकरिता शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल अन्यथा सदर भाषा ही ऑनलाइन पद्धतीने शिकविण्यात येईल.** सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य भाषा असेल. या कार्यवाहीसंबंधीचे सर्व नियोजन हे आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यास्तरावरून तात्काळ करण्यात येईल. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांव्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता ६ वी ते १० वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण प्रमाणे असेल."

२. सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५०६१७२२३३५९३४२१ असा आहे. हे शासन शुद्धिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(तुषार महाजन)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 10.07.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.07.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,........................................................

..............................................................

..............................................................

..............................................................